# 'सहकारी बँकांनी विकासाभिमुख व्हावे'

**नवी दिल्ली, ता. २३ (पीटीआय) :** नागरी सहकारी बँकांनी विकासाभिमुख होण्याची तसेच स्पर्धेत टिकून राहण्यासाठी बँकिंगची आधुनिक पद्धत स्वीकारण्याची गरज आहे, असे प्रतिपादन केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी आज केले. नागरी सहकारी बँका आणि पतसंस्थांच्या राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. नागरी बँकांतील सुधारणांवरही त्यांनी भर दिला. त्याचप्रमाणे, या बँकांनी संगणकीकृत हिशोब प्रक्रियेसह संरचनात्मक बदल स्वीकारावेत. त्याचप्रमाणे, तरुणांना संधी द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

ते म्हणाले, की सध्या देशातील एकूण बँकिंग क्षेत्रात ठेवी आणि आगाऊ रक्कम देण्यात नागरी सहकारी बँकांची भूमिका नगण्य आहे. देशात एकूण १,५३४ नागरी सहकारी बँका असून ५४ अनुसूचित नागरी सहकारी बँका आहेत. परंतु, विकास असमान आहे. नागरी बँकांनी विकासाभिमुख होण्याची तसेच बँकिग क्षेत्रातील स्पर्धेत टिकून राहण्यासाठी बँकिंगच्या आधुनिक पद्धत स्वीकारण्याची गरज आहे. त्यामुळे, भविष्यातील आव्हानांत सहकारी बँका तग धरू शकतील, असेही त्यांनी यावेळी नमूद केले. शहा यांनी १०० वर्षे पूर्ण करणाऱ्या नागरी सहकारी बँकांचाही सत्कार केला.

**NEWS PAPER NAME:- SAKAL**
**NEWS PUBLISHED DATE:- 24-06-2022**
**PAGE NO:- 07**